नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग,
शाखा औरंगाबाद.

जा.क्र. अकृषिक परवानगी/ मौ. कुंभेफळ ता.जि.औरंगाबाद/गट नं. ३५० व ३५१ पै./ससंओ/ 9629

औरंगाबाद.
दि.23/११/२०१७

प्रति,

मा. जिल्हाधिकारी,
औरंगाबाद.

विषय:- **म.ज.म.अ.,१९६६ चे कलम ४२ (ब) १ क (१) नुसार विकास परवानगी देणेबाबत.**
मौ. कुंभेफळ ता. औरंगाबाद गट नं. ३५० व ३५१ पै.क्षेत्र ९८००.०० चौ. मी. निवासी या वापरासाठी **अंतिम** मंजूरी (Final Approval) व सिमांकनास शिफारस करणे बाबत.

अर्जदार :- श्री. आण्णा भिकाजी मुळे व साईनाथ भिकाजी मुळे

संदर्भ :- १) या कार्यालयाचे पत्र क्र.१५००, दिनांक ०६.१०.२०१७.
२) अर्जदाराचा अर्ज दिनांक १६.११.२०१७.

महोदय,

संदर्भित पत्र क्र.१ अन्वये अन्वये मौजे कुंभेफळ ता. औरंगाबाद गट नं. ३५० व ३५१ पै.क्षेत्र ९८००.०० चौ. मी. क्षेत्रामध्ये **निवासी** वापराकरीता भूमि अभिन्यासास विकास परवानगी बाबतच्या रेखांकनास या कार्यालयाने तात्पुरत्या मंजूरीची शिफारस केलेली आहे. संदर्भित पत्र क्र.२ अन्वये सिमांकित अभिन्यास व सिमांकित मोजणी नकाशे सादर करुन अंतिम मंजूरी मिळणेसाठी विनंती केलेली आहे.

प्रस्तावात नगर नियोजनाच्या दृष्टीने छाननी करण्यात आलेली असून मंजूर प्रादेशिक योजने नुसार प्रस्तूत जागा शेंद्रा औद्योगीक वसाहती लगतच्या "नवनगर" झोन प्लॅन मध्ये रहिवास विभागामध्ये समाविष्ट आहे. त्यामुळे या जागेत रहिवास हा वापर अनुज्ञेय आहे. त्या अनुषंगाने सादर अभिन्यास नगर रचनेच्या दृष्टिने सर्वसाधारणपणे योग्य असल्याने त्यास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून रहिवास या वापरासाठी **अंतिम** (Final Approval) मंजूरीची शिफारस करण्यात येत आहे.

प्रकरणासोबत जागेचा मोजणी नकाशा मो.र.क्र.१३२१/२०१७ मोजणी दिनांक ०६.११.२०१७ नुसार जागेवरील दर्शविलेले रस्ते विचारात घेऊन तसेच तलाठी यांनी दिलेला ७/१२ उतारा व सोबत रेखांकन नकाशे व त्यावर जमिन मालकांच्या स्वाक्षऱ्या विचारात घेऊन आणि अर्जदार यांनी दिनांक १५.०९.२०१७ रोजी कार्यालयास सादर केलेल्या बंधपत्रानुसार अर्जदाराने सादर केलेली कागदपत्रांची सत्यता ग्राहय धरुन, अभिन्यासास नियोजनाच्या दृष्टीने खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून **रहिवास** वापरासाठी **अंतिम** (Final Approval) मंजूरीची शिफारस करण्यात येत आहे.

१. अर्जदाराने प्रस्तावात समाविष्ट केलेले ७/१२ उताऱ्या नुसार जमिनीची भोगवटादार वर्गवारी तसेच उपअधिक्षक, भूमी अभिलेख, औरंगाबाद यांनी तयार केलेल्या वहिवाट दर्शविणाऱ्या मोजणी नकाशातील क्षेत्र,पोहच रस्ता इत्यादी बाबत आपल्या स्तरावर पुनश्चः खातरजमा व शाहनिशा करण्यात यावी.
२. रेखांकन नकाशावर दर्शविण्यात आलेली मोजमापे व त्यानुसारचे क्षेत्रफळ हे वास्तूविशारद यांनी अंदाजीत परिगणीत केले आहे. त्यामुळे अंतिम सिमांकना नंतर उपअधिक्षक भूमि अभिलेख यांनी अंतिम सिमांकन नकाशावर दर्शविलेले क्षेत्रफळ कायम धरण्यात येईल.
३. अर्जदारास अभिन्यासातील सर्व रस्ते, नाल्या इत्यादीचे बांधकाम स्थानिक प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या प्रमाणानुसार पुर्ण करावे लागेल व सदर रस्ते व नाल्या पुढील व्यवस्थापनासाठी स्थानिक प्राधिकरणाच्या ताब्यात नाममात्र शुल्कावर हस्तांतरीत कराव्यात. रेखांकनाअंतर्गत रस्ते व नाल्याचे बांधकाम करणे अर्जदारास शक्य नसल्यास या कामासाठी स्थानिक प्राधिकरण आकारेल ती विकास खर्चाची रक्कम रोख भरावी लागेल.

Residential dim २०१७/११

Seal of the Sub-Registar No.6 दुय्यम निबंधक औरंगाबाद क्र.६ यांची मुद्रा Aurangabad.

अ ग ग -६
9303 | 9८ | 33
२०१८